पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक : १२/०४/२०२४

## गोवा राज्यातुन मद्याची तस्करी करणारे पुरवठादार ग्रामीण पोलीसांचे जाळयात नाशिक शहरातील मद्य तस्करी करणारा हस्तक फिरोदिया अटकेत, रॉयल ब्ल्यु व्हिस्कीचे यापुर्वी हस्तगत केलेले ४४८ बॉक्ससह आणखी '२४० बॉक्स' जप्त एकुण ६६ लाखांचा अवैध मद्यसाठा हस्तगत

---

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक सन २०२४ च्या पार्श्वभुमीवर दिनांक ०५/०४/२०२४ रोजी नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गावर सोग्रस फाटा परिसरात गोवा राज्य निर्मित मद्याची विनापरवाना बेकायदेशीररित्या तस्करी करणारे ट्रकवर छापा टाकून ४३ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त केल्याप्रकरणी वडनेर भैरव पोलीस ठाणे येथे गुरनं ९५/२०२४ भादवि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एक आरोपीस अटक करण्यात आली होती. त्याचे कब्जातील ट्रकमधून गोवा राज्य निर्मित रॉयल ब्ल्यु व्हिस्कीचे ४४८ बॉक्स किं.रू. ४३ लाखांचा मद्यसाठा जप्त करण्यात आला होता.

आरोपी पदमसिंग बजाज हा गोवा राज्यातुन मद्यसाठा ट्रकमध्ये भरून मुंबई आग्रा महामार्गाने गुजरात राज्यात घेवुन जाणार असल्याचे तपासात समोर आले होते. सदर आरोपीकडे अधिक चौकशी केली असता, त्याने सदरचे मद्य हे गोवा राज्यातील महेश शेठ व बिलाल यांचे सांगण्यावरून नाशिक येथील फिरोदिया शेठ यांचे मार्फतीने त्यांचे आर्या ट्रान्सपोर्टकडील वाहनातून गुजरात राज्यात राजु शेठ यांचेकडे पाठविण्यात येणार असल्याचे तपासात निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणातील परराज्यातुन होत असलेल्या अवैध मद्य तस्कीचे पाळे-मुळे नष्ट करण्यासाठी, तसेच यातील मुख्य आरोपींना तातडीने अटक करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकांना तपासकामी गोवा व राजस्थान राज्यात रवाना करण्यात आले होते. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकाने गोवा राज्यात जुना गोवा परिसरातील गोवा-कर्नाटक महामार्गावर सतत तीन दिवस पाळत ठेवुन यातील मद्याचा पुरवठा करणारे खालील गुन्हेगारांना महामार्गावर सिनेस्टाईल पाठलाग करून शिताफिने ताब्यात घेतले आहे.

१) **महेशकुमार भुरालाल तन्ना**, वय ५८, मुळ रा. राजश्री टॉवर, सॅटलाईट, अहमदाबाद, गुजरात, हल्ली - मार्टीन एनक्लीव्ह, मिरामार, पणजीम, गोवा. **(गोवा राज्य निर्मित मद्य - पुरवठादार)**

२) **बिलाल उर्फ अदनान सैफुद्यीन मन्सुरी,** वय २८, मुळ रा. जमजम सोसायटी, ओलपाड, सुरत, गुजरात, हल्ली - मार्टीन एनक्लीव्ह, मिरामार, पणजीम, गोवा. **(गोवा राज्य निर्मित मद्य तस्करी - मॅनेजर)**

यातील आरोपी मद्य पुरवठादार महेशकुमार तन्ना हे गोवा राज्य निर्मित व मर्यादीत असलेला मद्यसाठा हा नाशिक येथील आशिष शेठ फिरोदीया यांचे मार्फतीने महाराष्ट्र व गुजरात राज्यात तस्करी करीत असल्याचे तपासात समोर आले आहे. यातील आरोपी आशिष फिरोदीया यास नाशिक शहरातील गंगापुर रोड परिसरातुन ताब्यात घेण्यात आले आहे.

३) **आशिष अमरचंद फिरोदीया,** वय ५३, रा. ३०३, प्रियंका ब्लॉसम, सिरीन मिडोज, गंगापुर रोड, नाशिक

यातील आरोपी आशिष फिरोदीया हा त्याचे अवैध मद्य तस्करीमधील परराज्यातील साथीदारांसह नेटवर्क चालवून नाशिक जिल्हयासह गुजरात राज्यात मद्याची तस्करी करत होता. जिल्हयातील परराज्यातुन येणारे अवैध मद्याचे नेटवर्कचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ग्रामीण पोलीसांची पथके सत्वर कारवाई करत असून महेश तन्ना याचा नाशिक शहरातील हस्तक आशिष फिरोदीया याचे अटकेमुळे मद्य तस्करीची राज्यातील पाळे-मुळे खोदण्यास पोलीसांना मदत होणार आहे.

यातील आरोपी क्र. १ ते ३ यांना वडनेर भैरव पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने त्यांची १४ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीतांनी दिलेल्या कबुलीवरून रॉयल ब्ल्यु व्हिस्कीचे आणखी २४० बॉक्स किं.रू. २३,०४,०००/- चा अवैध मद्यसाठा हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. गणेश शिंदे हे करीत आहे. सदर गुन्हयातील उर्वरित आरोपींचा पोलीस पथक कसोशिने शोध घेत असुन मद्य तस्करीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

**यातील ताब्यात घेतलेले आरोपींविरूध्द दाखल गुन्हयांची माहिती -**

| आरोपीचे नाव | अ.क्र. | दाखल गुन्हे |
|---|---|---|
| **महेशकुमार भुरालाल तन्ना** | १ | **क्राईम पो.स्टे.** अहमदाबाद शहर गुरनं ०२/१९९८ भादवि कलम ४२०,४६४,४६८,४७२ सह कॉपीराईट ॲक्ट |
| | २ | **किम पो.स्टे.** सुरत जिल्हा, गुरनं १३/२०२३ गुजरात (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(अ)(ई),८१,८३,९८(२) |
| | ३ | **कलोळ पो.स्टे.** पंचमहल जिल्हा गुरनं २८५/२००८ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५,६६,८१,८२,८३ |
| | ४ | **वालोड पो.स्टे.** तापी जिल्हा गुरनं ११८२४००२२११ ६२३/२०२३ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(ई),८१,८३,९८(२) सह भादवि कलम ४६५,४६५,४७१ |
| | ५ | **नबीपुर पो.स्टे.** भरूच जिल्हा गुरनं १११९९०३८२२०६५१/२०२३ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(अ)(ई), ८१, ८३, ९८(२) सह भादवि कलम ४६५,४६५,४७१,२०१ |
| | ६ | **पळसाना पो.स्टे.** सुरत जिल्हा गुरनं ११२१४०४६२१ ०१६६/२०२२ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(ई),९८(२),८१ |
| | ७ | **सुरत डी.सी.बी. पो.स्टे.** सुरत जिल्हा गुरनं ११२१००१५२२ ००३४/२०२२ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(अ)(ई),९८(२),८१ |
| | ८ | **कडोदरा GIDC पो.स्टे.** सुरत जिल्हा गुरनं ११२१४०२३२२ ०३८८/२०२३ (बॉम्बे) प्रोही. ॲक्ट ६५(अ)(ई),९८(२),८१ |
| **आशिष अमरचंद फिरोदीया** | १ | **निफाड पो.स्टे.** नाशिक ग्रामीण गुरनं ६८१/२०२१ भादवि कलम ३९५, ३४१, १२०(ब) |
| | २ | **गंगापुर पो.स्टे.** नाशिक शहर गुरनं ६६/२०२३ प्रोही. ॲक्ट ६५(ई) |
| | ३ | **अंबड पो.स्टे.** नाशिक शहर, गुरनं ६८१/२०२० भादवि कलम २६९, २७०, म.पो.का.क. १३५ |
| | ४ | **सातपुर पो.स्टे.** नाशिक शहर, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १३८ वॉरंट |
| | ५ | **अंबड पो.स्टे.** नाशिक शहर, गुरनं २२१/२०१७ टोबॅको कंट्रोल ॲक्ट कलम ७,२० |
| | ६ | **इंदिरानगर पो.स्टे.** नाशिक शहर, गुरनं २५८/२०१२ प्रोही. ॲक्ट ६५(ड) ८१,८२ |
| **बिलाल उर्फ अदनान सैफुद्दीन मन्सुरी** | ३ | **सचिन पो.स्टे.** सुरत जिल्हा, गुजरात गुरनं ११२१००५४२ २२६०१/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट ८(सी) २२(सी) २९ |

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. बी.जी. शेखर पाटील, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने व अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, येवला तालुका पो.स्टे.चे पोलीस निरीक्षक श्री. संदिप मंडलीक, स्थागुशाचे पथकातील सपोनि गणेश शिंदे, पोउनि नाना शिरोळे, पोहवा नवनाथ सानप, संदिप नागपुरे, मेघराज जाधव, हेमंत गरूड, पोना विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, विशाल आव्हाड, मनोज सानप, कुणाल मोरे, प्रविण गांगुर्डे, चालक तानाजी झुरडे यांचे पथकाने वरील आरोपींना ताब्यात घेवून कारवाई केली आहे.